# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# गुडबाय फारो !




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Lyn Doerksen



60 गोष्टींतील 11 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi



फारोला राग आला होता! देवाने मोशेच्या व्द्वारे इस्त्राएल लोकांना मिसर देशाच्या बाहेर जाऊ द्यावे असे फारोला सांगितले होते.

1



पण त्याने नाकारले. गुलामांचे जे अधिकारी होते त्यांना फारो ने आज्ञा केली की, "त्यांना अधिक कठिण काम करायला लावा." इस्त्राएल लोकांसाठी आता पुर्वी पेक्षा परिस्थिती जास्त बिकट बनली होती.

2


"पुर्वी इतक्याच विटा तुम्ही तयार करायला हव्यात परंतू त्यासाठी लागणारे गवत आम्ही पुरविणार नाही, तर प्रत्येकाने आपआपले गवत गोळा करायचे आहे." याप्रकारे फारोने नविन फरमान काढले.
3


फारोच्या मुकादमांनी काही गुलामांना मार दिला कारण त्यांच्याजवळ गवत गोळा करुन पुर्वी इतक्याच विटा बनविण्यास वेळ नव्हता.
4


या त्यांच्या त्रासामुळे लोकांनी मोशे व अहरोन यांच्यावर दोषारोप लावले. मोशेने परमेश्वराकडे जाऊन प्रार्थना केली. "हे प्रभू," तो रडला, "तु तुझ्या लोकांची सोडवणूक तर मुळीच केली नाही."
"मी प्रभू परमेश्वर आहे, आणि मी त्यांना बाहेर काढीन," असे परमेश्वराने त्याला सांगितले.
5


मग परमेश्वराने मोशे व अहरोन यांना परत फारोकडे पाठविले. जेंव्हा महान राजा फारो याने देवाच्या सेवकांना देवाकडून काही चिन्ह दाखविण्यास सांगितले तेंव्हा अहरोनाच्या
हातातील काठीचा सरपटणारा साप बनला.
6


"माझ्या मांत्रिकांना बोलवा," अशी फारोने गर्जना केली. जेंव्हा त्या मिसरी जादुगारांनी आपआपल्या काठ्या खाली टाकल्या तेंव्हा त्या सर्वांच्या काठ्या सुध्दा साप बनल्या. परंतू अहारोनाच्या काठीने त्यांच्या काठ्या गिळून टाकल्या. तरी देखिल लोकांना जाऊ देण्यास फारोन नाकारले.
7


दुसऱ्या सकाळी, मोशे व अहरोन फारोला नदीजवळ भेटले. जेंव्हा अहरोनाने त्याची काठी पाण्यावर मारिली तेंव्हा परमेश्वराने त्या पाण्याचे रक्त केले.
8


मासे मरण पावले! लोक ते पाणी पिऊ शकत नव्हते! परंतू फारोने आपले मन कठिण केले. तो इस्त्राएल लोकांना मिसर देशातून जाऊ देईना.
9


परत, मोशेने फारोला इस्त्राएल लोकांस जाऊ देण्याविषयी सांगितले. परत फारोने जाऊ देण्याचे नाकारले. देवाने दुसरी पीडा पाठवली. सर्व मिसर देश बेडकांनी भरुन गेला. प्रत्येक घरांत, प्रत्येक खोलीत, एवढेच नव्हे तर स्वंयपाक करण्याच्या भांड्यांत देखिल बेडकेच बेडके झाली होती!
10


"देवाने बेडके काढून टाकावे, म्हणून माझ्यासाठी प्रार्थना करा, म्हणजे मी तुमच्या लोकांना जाऊ देईन." अशी फारोने विनंती केली. परंतू जेंव्हा बेडके नाहीसे झाले तेंव्हा फारोने त्याचे मन बदलले. त्याने गुलामांना मोकळे केले नाही.
11


त्यानंतर देवाने कोट्यावधी बारिक किडे ज्यांना आम्ही उवा म्हणतो ते पाठविले. मनुष्य व प्राणी उवांनी भरुन गेले त्यांच्या चावांनी त्यांना खाज सुटली, परंतु तरी देखिल फारो देवाला शरण गेला नाही.
12


नंतर देवाने गोमाशांचे थवे पाठविले. मिसरी लोकांचे प्राणी मारुन टाकण्यासाठी देवाने रोगराईने मरी पाठविली. भयानक त्रास देणारे गळवे पाठविले. लोकांना महाभयंकर त्रास झाला. तरी देखिल फारोने देवाला विरोध केला.
13


गळवांच्या पीडे नंतर देवाने गारांची पीडा आणि त्यानंतर टोळांचे सैन्य पाठविले. टोळांनी देशातील सर्व हिरवळ फस्त केली.
14



त्यानंतर देवाने निबिड अंधकाराचे तीन दिवस पाठविले. परंतू हट्टी फारो इस्त्राएल लोकांना जाऊ देईना.

15

"मी अजून एक पीडा पाठविन," अशी देवाने चेतावनी दिली. "मध्यरात्रीच्या सुमारांस, मनुष्यांतील किंवा जनावरांतील सर्व प्रथम जन्मलेले जे आहेत ते मरतील." इस्त्राएल लोकांनी जर मेंढराचे रक्त त्यांच्या घराच्या दोन्ही दारबाह्यांना व चौकटीच्या कपाळपट्टीला लावले तर त्यांचे प्रथम जन्मलेले वाचतील असे परमेश्वराने त्यांना सांगितले.



16



मध्यरात्रीच्या सुमारास, मिसरांत मोठा आक्रोश निर्माण झाला. मरणाने वार केला होता. प्रत्येक घरातील कमीत कमी एक मनुष्य मेला होता.

17



"येथून निघून जा, जा, देवाची सेवा करा." अशी फारोने मोशेला विनंती केली. देवाच्या लोकांनी लवकरच मिसर देशाची हद्द पार केली.

18



देवाने मोशेला सांगितले की, वल्हांडणाची ही रात्र विसरु नका, कारण या रात्री देवाच्या दुताने इस्त्राएल लोकांची घरे ओलांडून फारो आणि त्याच्या लोकांवर मारा केला.

19



मिसरात येऊन ४३० वर्षांनंतर, देवाचे लोक आता मुक्त झाले होते. दिवसा मेघस्तंभाच्या व्द्रारे आणि रात्री अग्नीस्तंभाच्या व्द्रारे देवाने त्यांना चालविले.

20













गुडबाय फारो !

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

निर्गम ४–१५

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!